पुढारी पा.नं. ६.

# मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्यावर कारवाई

## पीडित १५ वर्षांच्या मुलीची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड परिसरातील पूनम सागर रस्त्यावरील एका मसाज सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली तरुण मुलींकडून वेश्या व्यवसाय करून घेणाऱ्या मालक व दलालावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई केली आहे. या कारवाईत पीडित १५ वर्षाच्या पीडित अल्पवयीन मुलीची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका केली आहे. नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील पूनम सागर रोडवरील एका दुकानात, अक्युप्रेशर मसाज सेंटर दुकानात मसाजच्या नावाखाली अल्पवयीन तरुणीकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर अहिराव यांना मिळाली. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पथक व गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करून बोगस ग्राहक आणि पंच नचरोपॅथी अँड ॲक्युप्रेशर मसाज सेंटरमध्ये पाठवून मसाज सेंटरवर छापा टाकला. मसाज सेंटरच्या महिला मालकाला ताब्यात घेऊन १५ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलीची वेश्याव्यवसायाच्या दलादलीतून सुटका केली. मसाज सेंटरचा मालक आणि मसाज सेंटरमधील दलाल गेल्या ८ महिन्यांपासून मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. महिला मालक आणि मसाज सेंटर चालवणाऱ्या एजंटवर पोस्को व विविध वेगवेगळ्या कलमांखाली नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलीला महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

अशा प्रकारे आपल्या आजूबाजूला गैरप्रकार घडत असल्यास त्वरित स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन या गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसांनी केले आहे.

पुण्यनगरी पु.पा.१०

# हिरे व्यापाऱ्याचा मुलगा खून प्रकरणी अटकेत



**नालासोपारा :** मुंबईतील हिरे व्यापाऱ्याच्या मुलाने आपल्या मैत्रिणीचा खून केल्या प्रकरणी पोलिसांनी पळून जात असताना त्याला मोठ्या शिताफीने अटक केली.

मुंबईतील हिरे व्यापाऱ्याचा मुलगा हार्दिक शहा याचे नर्स मेघा तोरवी हिच्या सोबत संबंध होते. तिच्यावर आतापर्यंत त्याने ४० लाखांची उधळपट्टी केली होती. त्यामुळे त्याच्या वडिलांनी हार्दिकला घरातून बाहेर काढून संबंध तोडले होते. तो त्याच्या आईकडे तिला घेऊन गेला. आईने त्याला भाड्याने राहण्याचा सल्ला दिला. आई त्याला अधूनमधून पैसे पुरवत होती. मात्र आईकडून पैसे मिळायचे बंद झाल्याने मेघा आणि हार्दिकमध्ये दररोज भांडणे होत असत. अखेर हार्दिकने मेघाचा गळा आवळून खून केला आणि मेघाच्या काकीला मी तुमच्या मेघाला संपवून निघालो आहे.

तिचा मृतदेह पाहिजे असेल तर घेऊन जा, असा संदेश पाठवला. त्यामुळे हा खून हार्दिकने केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. मेघाचा खून करून हार्दिक पळून गेल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी तत्काळ दखल घेत पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, पोलीस आयुक्त अमोल मांडवे, गुन्हे शाखेचे शाहूराज रणवरे, तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी आपापल्या टीम रवाना केल्या. यावेळी हार्दिक हा ट्रेनने जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर आरपीएफला संपर्क करून आरोपीचा फोटो पाठवून गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या अधिकाऱ्यांनी जीआरपीच्या मदतीने दिल्लीला पळून जाणाऱ्या आरोपीला नागदा रेल्वे स्थानकातून अटक केली. मेघाच्या खुनामागे पैशावरून भांडण की अन्य काही कारण होते, याचा तपास तुळींज पोलीस करत आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पु.पा. ३०

# विरार शहरात बविआ छेडणार पाणी आंदोलन

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

विरार शहरात पूर्वेला मनवेलपाडा परिसरात सतत पाण्याचा अपुरा पुरवठा होत असतो. सततच्या अनियमित पाणीपुरवठ्यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले असून अपुरा पाणीपुरवठा, सुरळीत करण्यात यावा, " या मागणीसाठी आयुक्त अनिलकुमार पवार यांना बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील व माजी नगरसेवक प्रशांत राऊत यांच्या नेतृत्व-खाली नागरिकांच्या शिष्टमंडळाने

## आयुक्त अनिलकुमार पवारांना दिले निवेदन

निवेदन दिले. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

वसई-विरार महापालिकेतील नगरसेवकांची मुदत २८ जून २०२० रोजी संपल्यापासून येथील पाणीपुरवठा अनियमित आहे. पालिकेत लोकप्रतिनिधींची सत्ता नसल्याने व राज्यातील अन्य राजकीय घडामोडींमुळे वसई-विरार महापालिकेच्या निवडणुका गेली तीन वर्षे होऊ शकलेल्या नाहीत.

या तीन वर्षात वसई-विरार महापालिकेवर प्रशासकीय कारभार सुरू आहे. पालिकेच्या या प्रशासकीय राजवटीत नागरी सुविधांचा बोजवारा उडालेला आहे. सामान्य नागरिकांना पालिकेकडून आवश्यक सोय-सुविधा मिळत नाहीत. मनवेलपाडासारख्या भागात मागील एक वर्षात पाण्याची गरज पूर्ण होत नाही.

# वसईत टँकरमाफियांची दुकाने चालवण्यासाठी पाणीपुरवठा खंडित

## पाण्याचे ऑडिट रिपोर्ट सार्वजनिक करा; भाजपचा आरोप

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

एकीकडे वसई-विरार महानगरपालिका तालुक्यातील नागरिकांना पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून देत असल्याची वाहवा लुटत आहे, तर दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून नागरिक पाण्याच्या थेंबथेंबासाठी तडफडत असल्याची चर्चा आहे. याचा फायदा घेत टँकरमाफिया रु.१५००/- ऐवजी नागरिकांकडून ३२०० रुपये लुटले जात असल्याची चर्चा प्रसारमाध्यमांमध्ये होत आहे. त्यामुळे टँकरमाफियांची दुकाने चालवण्यासाठी पाणीपुरवठा खंडित केला जात असल्याचे भाजप वसई-विरार जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी म्हटले आहे.



महापालिका प्रतिव्यक्ती प्रतिदिन ८० लिटर पाणी देऊ शकते, एवढे पाणी उपलब्ध आहे, हे खरे आहे. मात्र नागरिकांना त्यांचा हक्काचे पाणी मिळत नाही. त्यामुळे या गंभीर बाबीबाबत पालघरचे तत्कालीन पालकमंत्री दादासाहेब भुसे यांनी पालिका आयुक्तांना १७ नोव्हेंबर २०२१ रोजी पाण्याचे ऑडिट करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या विषयाबाबत भाजप वसई-विरार जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी पाण्याचे ऑडिट झाले असेल, तर ऑडिट रिपोर्ट सार्वजनिक करा, अशी मागणी अनेकवेळा केली आहे. मात्र तो अहवाल सार्वजनिक न केल्याने महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या मनात शंका निर्माण करण्याचे काम केले आहे.

महापालिकेकडे पुरेसा पाणीसाठा असूनही गेल्या दहा दिवसांपासून नागरिक पाण्यासाठी वणवण करत आहेत. या विषयासंदर्भात भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना पत्र लिहून काही प्रश्न विचारले असून त्यांची उत्तरे मागितली आहेत. टँकर माफियांवर कारवाईची मागणी केली आहे.

पुढारी पु.पा. १

# एस.टी. कामगार संघटनेकडून न्यायालयात अवमान याचिका दाखल

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

औद्योगिक न्यायालयाने एस.टी. कर्मचाऱ्यांचा दर महिन्याच्या ७ तारखेला पगार करण्याचे आदेश देऊनही दरमहा कर्मचाऱ्यांच्या पगाराला विलंब होत आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराला विलंब करून राज्य सरकार औद्योगिक न्यायालयाच्या आदेशाचा भंग करत आहे. राज्य सरकारने कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत द्यावेत, अशी मागणी वारंवार करूनही दर महिन्याचा ७ तारखेला पगार होत नसल्याने महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या कामगार न्यायालयात (मुंबई) अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे.

न्यायालयाने कंटेम्प्ट दाखल करून घेतलेले आहे. १४ फेब्रुवारीपर्यंत कामगारांना वेतन न मिळाल्याने तातडीने वेतन द्यावे, अन्यथा न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा आणि नोटीसही संघटनेच्या वतीने प्रशासनास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. पी. शंकर शेट्टी यांनी बजावलेली होती. १५ फेब्रुवारीपर्यंत वेतन न झाल्यास न्यायालयात गुरुवारी फौजदारी स्वरूपाची अवमान याचिका संघटनेच्या वतीने दाखल करण्यात आली आहे.

मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या अंतिम इशाऱ्यानुसार कामगार न्यायालय (मुंबई) येथे अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. न्यायालयाने सदर याचिका दाखल करून घेतली असल्याची माहिती महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिली.

अनियमित वेतनाबाबत यापूर्वीच महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेने औद्योगिक न्यायालयात मुंबई येथे दावा दाखल केला होता. या दाव्याचा अंतरीम निकाल ३ सप्टेंबर २०२१ रोजी देताना न्यायालयाने मूळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रत्येक महिन्याच्या देय तारखेस एस.टी. कामगारांना वेतन दिले पाहिजे, असे आदेश दिले होते. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन अनियमित होत असल्याने एस.टी. कामगार संघटनेने ही फौजदारी स्वरूपाची अवमान याचिका दाखल केल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

Scanned with CamScanner

पुढारी पु-५ा.२०

# मोटार अपघात दाव्यात ४०२ प्रकरणांत तडजोड

## सुमारे ३५,०७,२०,९२६ रुपयांची भरपाई

ठाणे : पुढारी वृत्तसेवा

घात दावा न्यायाधीकरणाकडे सुमारे ८६४ दावे दाखल करण्यात आले होते. त्यातील ४०२ दाव्यांमध्ये तडजोड होऊन सुमारे ३५,०७,२०,९२६ रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. यात सर्वाधिक म्हणजे ३१७ दावे ठाणे मुख्यालयात निकाली निघाले आहेत.




गेल्या आठवड्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोकअदालतमध्ये तालुका व विविध न्यायालयांतील दावे तडजोडीसाठी आले होते. यात मोटार अपघात प्रकरणांतील ठाणे, कल्याण, वसई आणि पालघरमधून सुमारे ८६४ अपघात दावे तडजोडीसाठी आले होते. त्यातील सर्वाधिक ठाणे मुख्यालयातील सुमारे ५७३ दावे तडजोडीसाठी लोकन्यायालयापुढे सादर करण्यात आले होते, त्यातील ३१७ प्रकरणांत तडजोड होऊन सुमारे २६,२५,६५,५४१ रुपयांची रक्कम तडजोडीत मंजूर झाली. सर्वात कमी दावे वसईमध्ये दाखल झाले. वसईतून दाखल झालेल्या ४८ दाव्यांपैकी १७ दावे निकालात निघाले. त्याच्या भरपाईपोटी सुमारे १३,२८,४३,८५ मंजूर करण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सूर्यवंशी यांनी दिली.

### मोटार अपघात प्रकरणांतील दाखल, निकाली निघालेले दावे व तडजोडीची रक्कम

| ठिकाण | आलेले दावे | निकाली निघालेले | एकूण तडजोड रक्कम |
|---|---|---|---|
| ठाणे | ५७३ | ३१७ | २६,२५,६५,५४१ |
| कल्याण | १७३ | ५२५ | ९.५१,४०,००० |
| वसई | ४८ | १७ | १३.२८,४३.८५ |
| पालघर | ७० | १६ | १५.३५,७०,०० |
| एकूण | ८६४ | ४०२ | ३५,०७,२०,९२६ |

सामना पा. नं. २०

# २० फेब्रुवारीपासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 'काम बंद' आंदोलन

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - २० फेब्रुवारीपासून राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठीय व महाविद्यालयीन परीक्षांवर बहिष्कार टाकला आहे. १४ फेब्रुवारीपासून हे आंदोलन अधिकच पेटले असून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लंच टाइममध्ये निदर्शने केली. १५ फेब्रुवारीला काळ्या फिती लावून काम केले, तर १६ फेब्रुवारीला एक दिवसाचा लाक्षणिक संप केला. बुधवारी उपमुख्यमंत्र्यांसोबत राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या बैठकीत विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊनही सरकारकडून लेखी आश्वासन मिळत नसल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे बारावी परीक्षा काळातही आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुरुवारी पुकारलेला एक दिवसाचा लाक्षणिक संप १०० टक्के यशस्वी झाला. मुंबई विद्यापीठासह एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबईसह राज्यातील इतर जिल्ह्यांतील विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा संप केला. कर्मचाऱ्यांनी हजेरी पत्रकात स्वाक्षरी न करता विद्यापीठ, महाविद्यालयाच्या गेटपाशीच आंदोलन केले. राज्य सरकारकडून मागण्यांसंदर्भात लेखी आश्वासन मिळत नसल्याने येत्या सोमवारपासून बेमुदत 'काम बंद' आंदोलन करण्याचा निर्णय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला आहे.

बारावीच्या शिक्षकांप्रमाणेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या या खूप काळापासून प्रलंबित आहेत. या मागण्यांकडे राज्य सरकार हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपेक्षा करीत असल्याचा आरोप श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघाचे महासचिव यशवंत गावडे यांनी केला आहे. या एक दिवसाच्या संपाची राज्य सरकारने दखल घेतली नाही तर २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची झळ २१ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षांनाही बसेल. पण विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानाला कर्मचारी नव्हे, तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी आडमुठी भूमिका घेणारे सरकार जबाबदार असेल, असा इशारा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही दिला आहे.

## या आहेत मागण्या

- सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा जीआर पुनर्जीवित करा.
- १०-२०-३० लाभाची योजना लागू करा.
- सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम द्या.
- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरा.
- २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा.
- १४१० विद्यापीठ कर्मचाऱ्यांना वेतन आयोग द्या.
- सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करा.

सामना पा.नं.५.

# घोडबंदर महामार्गाला सर्व्हिस रोड जोडण्यास शिवसेनेचा विरोध

## आंदोलनाचा इशारा

ठाणे, दि. १६ (प्रतिनिधी) – काही लोकप्रतिनिधींच्या दबावाला बळी पडून घोडबंदर महामार्गाला सर्व्हिस रोड जोडण्याचा घाट ठाणे महापालिका घालत आहे. तशा हालचालीही सुरू केल्या असून शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) त्यास ठाम विरोध दर्शवला आहे. वाहतूककोंडी दूर करण्याच्या नावाखाली कापूरबावडी ते गायमुखदरम्यान असलेले दोन्ही सर्व्हिस रोड महामार्गाला जोडले तर अनेक समस्या निर्माण होणार असून त्याचा नागरिकांना त्रासच होईल. तसेच अपघाताला आमंत्रण ठरेल. त्यामुळे अशा प्रकारचा निर्णय घेतल्यास शिवसेनेतर्फे मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ओवळा-माजिवडा विधानसभा क्षेत्रप्रमुख नरेश मणेरा यांनी दिला आहे.

सर्व्हिस रोडच्या दोन्ही बाजूला मोठी गृहसंकुले, हॉटेल्स, दुकाने, महाविद्यालय, बँका, शाळा व अनेक व्यापारी संस्था आहेत. त्यामुळे घोडबंदर महामार्गाला सर्व्हिस रोड जोडल्यास त्याचा प्रचंड त्रास नागरिकांना तसेच आजूबाजूच्या परिसराला होणार आहे. अपघाताचे प्रमाणदेखील वाढणार असून पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होईल, असा इशाराच नरेश मणेरा यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना पाठवलेल्या निवेदनात केला आहे.

मेट्रो ४ चे काम सध्या प्रगतिपथावर असून या कामासाठी लावलेल्या बॅरिकेट्समुळे वाहतूककोंडी होते.



या भागात मेट्रोमुळे शेकडो झाडांचा बळी गेला आहे. घोडबंदर येथे निवासी भागात निवासी गृहसंकुले दिवसेंदिवस वाढत असून त्यांच्यादृष्टीने सर्व्हिस रोड अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे कोणाच्याही दबावाला बळी न पडता सर्व्हिस रोड आहे तसेच ठेवावेत, ते मुख्य रस्त्याला जोडू नयेत, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने नरेश मणेरा यांनी केली आहे.

## पीडब्ल्यूडीकडे प्रस्ताव पाठवण्याचे आदेश

मुख्य घोडबंदर रस्ता हा पीडब्ल्यूडीच्या अंतर्गत असून सर्व्हिस रोड मात्र महापालिकेच्या क्षेत्रात आहे. सर्व्हिस रोड जोडणे कितपत योग्य आहे याबाबतची पडताळणी करावी व तसा प्रस्ताव पीडब्ल्यूडीकडे पाठवावा, असे आदेश आपण संबंधित अधिकाऱ्यांना दिले असल्याचे आयुक्त अभिजित बांगर यांनी दैनिक 'सामना'शी बोलताना सांगितले. तसेच यासंदर्भात कोणताही अंतिम निर्णय झाला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

स्वस्त घरांचे आमिष

# विरारमध्ये टोळीला बेड्या

वसई, दि. १६ (सा.वा.) – बँकांनी सील केलेल्या मालमत्ता व घरे स्वस्त दरात मिळवून देण्याचे आमिष दाखवत गोरगरीबांना फसवणाऱ्या टोळीला विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा कक्ष ३ ने बेड्या ठोकल्या आहेत. या टोळीवर ठाणे, मुंबईतही गुन्हे दाखल असून हीच कार्यपद्धती वापरत सर्वसामान्यांना ठगवले आहे.

पियुशकुमार दिवाण (५६) यांना व इतर ४४ लोकांना 'बिडर्स विनर्स' या विरार पश्चिम बोळिंज येथील बोगस कंपनीचे प्रवीण ननवरे, नितीन शर्मा, राहुल भट व अलायदा शहा यांनी भूलथापा देत फसवले. बँकेने लिलावात काढलेली मालमत्ता व घरे एन. पी. ए. तत्त्वावर स्वस्तात विकण्याचे आमिष आरोपींनी नागरिकांना दाखवले. त्यांच्याकडून एकूण ८० लाख रुपये रक्कम उकळली होती. मात्र त्यांना घर अथवा मालमत्ता न देता कंपनी बंद करून टोळीने पोबारा केला. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या टीमने तपास करत टोळीला अटक केली.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु.पा.१.

# वाळू उपाशामुळे वैतरणा पूल धोकादायक


## तस्करांना रोखण्यासाठी संयुक्त गस्त घालणार

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** विरारजवळील वैतरणा नदी पात्रात होत असलेल्या बेकायदा वाळू उपशामुळे पुलास धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी आता या वाळू उपशावर लक्ष ठेवण्यासाठी महसूल, पोलीस, मेरिटाइम बोर्ड अशा विविध विभागामार्फत गस्त वाढवून अधिक तीव्र कारवाई केली जाणार आहे.

पश्चिम रेल्वेवरील वैतरणा नदीवर अनेक वर्षे जुना पूल आहे. १९७० मध्ये या पुलाची पुनर्बांधणी करण्यात आली होती. विरार आणि वैतरणा खाडीवर पूल क्रमांक ९२ आणि ९३ असे दोन पूल आहेत. हे दोन्ही पूल रेल्वेद्वारे मुंबई व गुजरातला जोडणारे महत्त्वपूर्ण आहेत. या पुलावरून लोकल ट्रेन, मालवाहतूक गाड्या, एक्स्प्रेस अशा गाड्यांची वर्दळ असते. मात्र परिसरातच वाळू उपशामुळे पुलाला धोका निर्माण होऊ शकतो.

याबाबत २०१४ मध्ये नारंगी येथील शेतकरी संघटनेने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर वाळू उपसा रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या जातात याचा आढावा घेतला जात होता. सोमवारी परिस्थिती जाणून घेण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक पथक पाहणीसाठी आले होते. पुलाला धोका निर्माण होऊ नये यासाठी वाळू उपशावर लक्ष ठेवणे व वेळोवेळी कारवाई करणे अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. परिसरात विविध कारवायांत मिळून २० गुन्हे मांडवी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे. तर ३८ आरोपींना अटक करण्यात आली होती. तसेच ५ जणांकडून ३५ लाखांचा दंड वसूल करण्यास महसूल विभागाला मदत करण्यात आली असल्याची माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली आहे.



### बेकायदा वाळू उपशांवर कारवाई

वैतरणा परिसरात होत असलेल्या वाळू उपशावर महसूल विभाग पोलीस यांच्या मार्फत सातत्याने कारवाई करण्यात येते. नुकताच महसूल विभागाने परिसरात होत असलेल्या उत्खननावर कारवाई केली तर मांडवी पोलिसांनीही जुली बेट परिसरात वाळू उत्खननावर कारवाई केली आहे. या दोन्ही कारवायांत वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येत असलेले सक्शन पंप व इतर साहित्य जाळून नष्ट करण्यात आले आहे.

लोकमत पु.पा.३०

# मांसाची तस्करी करणाऱ्यांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** जनावराच्या मांसाची तस्करी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी वाहनासह अटक केली आहे. याप्रकरणी काशीमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

उपनिरीक्षक जगन्नाथ पडेलकर, हवालदार हौसराव आंधळे हे वरसावे पुलाठिकाणी बंदोबस्तासाठी तैनात असताना पहाटे नाकाबंदीदरम्यान एक पिकअप वाहन तपासणीसाठी बाजूला घेतले. या वाहनात ताडपत्रीखाली झाकलेले जनावराचे तुकडे सापडले. त्याचे वजन सुमारे साडेसोळाशे किलो भरले. पोलिसांनी चालक वाजिद अली शेख व साथीदार क्लिनर अहमदराजा सिद्दीकी यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी पाच लाख किमतीचे वाहन आणि २ लाख १५ हजारांचे मांस जप्त केले. मीरारोडच्या नया नगरमधील लियाकत याने मांस मागविल्याचे चालकाने सांगितल्यावर त्याचा शोध सुरू आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. ३.

## सफाई कामगारांसाठी मनसेचे उपोषण

भाईंदर, ता. १६ (बातमीदार) : मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने साखळी उपोषण सुरू केले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्यात येणास असल्याचे मनसेकडून जाहीर करण्यात आले आहे.

महापालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता ठेवण्यासाठी महापालिकेने कंत्राटदाराची नेमणूक केली होती. या कंत्राटदाराने सफाई कर्मचाऱ्यांचे दोन वर्षांचे वेतन तसेच बोनस न देऊन मिरा-भाईंदर महानगरपालिका तथा सर्व सफाई कर्मचाऱ्यांची फसवणूक केली आहे, असा आरोप मनसेने केला आहे. या कामगारांचा थकित पगार व बोनस त्यांच्या खात्यात जमा करावा, तसेच संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागण्यांसाठी भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे मनसेने साखळी उपोषण सुरू केले आहे. उपोषणात मनसेचे शहर अध्यक्ष हेमंत सावंत, मनसे कामगार कर्मचारी मिरा-भाईंदर महापालिका सेनेचे अध्यक्ष हरेश सुतार, महिला शहर अध्यक्षा कविता वायंगणकर यांच्यासह मनसेचे अन्य पदाधिकारी तसेच सफाई कर्मचारी सहभागी झाले.

# वसईकरांची अडथळ्यांची शर्यत

## कोंडीने नागरिक हैराण; रेल्वे स्थानकाला बेशिस्त वाहतुकीचे ग्रहण

वसई, ता. १६ (बातमीदार) : वसईत मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे, पण चाकरमान्यांसह सर्वसामान्य प्रवाशांना रेल्वेस्थानक गाठण्यासाठी मोठी अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे. कारण या परिसरात बेशिस्त वाहनचालकांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या कोंडीवर योग्य त्या उपाययोजना करण्यास अद्याप महापालिकेला यश आले नसल्याने नागरिकांतून नाराजीचा सूर उमटत आहे.

नालासोपारा, विरार यापाठोपाठ वसईलादेखील कोंडीचा विळखा कायम आहे. एकीकडे रस्त्यांचे रुंदीकरण केले जात असले तरी मात्र बेवारस वाहने, फुटपाथवरील फेरीवाल्यांचे अतिक्रमण, रस्त्यालगतची गॅरेज, दुकानाबाहेर उभी राहणारी वाहने, यामुळे वसई परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीत भर पडत आहे. वसईला पूर्व-पश्चिम ये-जा करण्यासाठी दोन उड्डाण पूल आहेत. मात्र यातील एका पुलावरून अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे एकाच पुलावर अधिक भार येत आहे.

यामुळे वाहनांच्या मोठ्या रांगा लागत आहेत. तसेच वसई पूर्वेला औद्योगिक वसाहत असल्याने सातिवली, वालीव, वसई फाटा, गावराईपाडा यासह आजूबाजूच्या परिसरात असणाऱ्या कारखान्यात जाणाऱ्या हजारो चाकरमान्यांना दररोज कोंडीला सामोरे जावे लागत आहे. शहरात कोट्यवधी खर्च करून रस्ते रुंदीकरण केले जात असले तरीही वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे.

वसई परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत असावी म्हणून सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. मात्र यात वारंवार बिघाड होत असतात. त्यामुळे मुख्य मार्गावरचे सिग्नल बंद होतात आणि वाहतूक कोंडीत भर पडते.

### कुठे अधिक कोंडी?

रेंज नाका, सातिवली, गोखिवरे, एव्हरशाईन, वालीव, वसई महामार्ग फाटा, माणिकपूर, अंबाडी मार्ग, पंचवटी, नवघर, पार्वती क्रॉस, बस आगार आणि रेल्वेस्थानकाकडे जाणारा मार्ग, नवघर माणिकपूर कार्यालय.



### उपाययोजना नाहीत

वसई पश्चिमेला दोन ते तीन खासगी वाहनतळ आहेत. त्यामुळे रस्त्यालगत चालक वाहने उभे करतात. अशा वाहनांवर कारवाई केली जाते. यात वाहतूक शाखा आणि महापालिका स्वतंत्र दंड आकारते. यात ५०० ऑनलाईन आणि ठेकेदारांकडून २०० असा ७०० रुपयांचा दंड आकारला जातो. पण हे करण्यापूर्वी वाहनतळ उभारावे, त्यानंतर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून कर्मचारी तैनात असतात. 'नो पार्किंग'मध्ये वाहने उभी असल्यास टोईंगने वाहने उचलली जातात. त्यावर नियमाप्रमाणे वाहतूक विभाग दंड आकारला जातो. रस्त्याच्या कडेला वाहने उभी असल्यास वाहतुकीला समस्या निर्माण होत असते, त्यामुळे त्यावरही कारवाई केली जाते.

- सागर इंगोले, पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग

महापालिकेच्या नवघर-माणिकपूर विभागीय क्षेत्रात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाते. तसेच नोटिसादेखील बजावण्यात येत असून दंड वसूल केला जातो.

- ग्लिसन गोन्सालिस, सहाय्यक आयुक्त, महापालिका

Scanned with CamScanner

# Gang accused of cheap flats fraud arrested

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The crime branch unit of Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have busted a gang that duped home seekers by offering fake flat deals at huge discounted prices.

Claiming to be agents appointed by banks to auction flats, which were attached over loan defaults, the fraudsters collected money in advance as processing fees by offering lucrative buying proposals to home seekers before fleeing in March 2022.

In response to a complaint filed by Piyush Diwan and 43 others who were collectively duped of more than Rs80 lakh, the crime branch unit was directed to conduct parallel investigations into the case. A team led by Inspector of Police Pramod Badhakh under the supervision of Assistant Commissioner of Police Amold Mandve started investigating the case and arrested Parvez Dastagir Shaikh alias Peter Siqueira, Saheb Hussain Shaikh alias Prashant Bansal, Alaida Shah, all residents of Mira-Bhayandar and Pravin Nanavare of Kalwa. Investigations revealed that the gang had a history of committing such crimes. They had earlier floated bogus real estate firms by setting up offices in Thane and Mumbai, where they duped home seekers of Rs2.95 crore. The fraudsters have been booked under the relevant sections of the Indian Penal Code.

Scanned with CamScanner

CMYK

वसई-विरार में लगे सभी मोबाइल टावर अवैध ...पेज-3

MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक

ओटीटी पर अपनी शादी दिखाने के लिए तैयार हंसिका मोटवानी ...पेज-6

मुंबई, सोमवार 20 फरवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website: www.mumbaihindmatatimes.com

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| संवत् 2079, फाल्गुन कृष्ण पक्ष अमावस्या | 07.04 am / 06.41 pm | | अधिकतम 34°C / न्यूनतम 23°C | NSE / BSE | |


# कट्टा बेचने वाले पहुंचे हवालात



**नालासोपारा।** तुलिंज पुलिस स्टेशन कि डिटेक्शन ब्रांच की टीम ने बंदूक की तस्करी करने वाले आरोपी को गिरफ्तार करने में कामयाबी हासिल कर ली है, मामला तुलिंज पुलिस स्टेशन अंतर्गत आने वाले संतोष भुवन इलाके का है, जहां पर पुलिस को जानकारी मिली की एक व्यक्ति बंदूक की तस्करी करने आने वाला है। जिसके बाद पुलिस ने जाल बिछाकर जियालाल उदयराज जैसवाल (45) आरोपी को गिरफ्तार कर लिया है और उसके पास से 1 देशी कट्टा और 2 जिंदा कारतूस बरामद किया है। पुलिस ने बताया कि आरोपी उत्तर प्रदेश के चंदवक का रहने वाला है और वह उत्तर प्रदेश से नालासोपारा यह कट्टा बेचने के लिए आया था।

Scanned with CamScanner

CMYK

वसई-विरार में लगे सभी मोबाइल टावर अवैध
...पेज-3

MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, सोमवार 20 फरवरी 2023

ओटीटी पर अपनी शादी दिखाने के लिए तैयार हंसिका मोटवानी
...पेज-6

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक-42 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुमित आचार्य

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन कृष्ण पक्ष अमावस्या | 07.04 am / 06.41 pm | दिन में गर्मी और रात में थोड़ी राहत मिलने के आसार है | अधिकतम 34°C / न्यूनतम 23°C | NSE Open: 17,974.85 \| Close: 17,944.20; BSE Open: 60,652.82 \| Close: 61,682.25 | Rs. 56,510 Per 10 gm; Rs. 68,600 Per Kg. |

# पुलिस आयुक्त के हाथों सम्मानित



**वसई।** जनवरी 2023 में उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले पुलिस अधिकारी व पुलिस कर्मचारियों को मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने प्रशस्ति-पत्र व पुरस्कार देकर उन्हें सम्मानित कर उनका मनोबल बढ़ाया है। यह सम्मान पत्र मासिक अपराध समीक्षा बैठक में दिया गया है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने दी है।

बताया गया है कि एमबीवीवी पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने अपने हाथों पुलिस निरीक्षक (साइबर क्राइम ब्रांच ) सुजितकुमार गुंजकर, पुलिस निरीक्षक शाहूराज रणवरे (क्राइम ब्रांच वसई यूनिट 02), पेल्हार पुलिस स्टेशन के सीनियर पीआई वंसत लब्दे, मिरारोड थाने वरिष्ठ पीआई विजयसिंह बगल और पीआई अविराज कुराडे और वसई-विरार (क्राइम ब्रांच यूनिट 3) के वरिष्ठ पुलिस निरीक्षक प्रमोद बडाख और वालीव पुलिस के पीआई कैलाश बर्वे को प्रशस्ति-पत्र व पुरस्कार देकर उनको गौरवान्वित किया। ज्ञात हो कि उक्त पुलिस अधिकारियों की उपस्थिति में पुलिस कर्मचारी यानी इनकी टीम द्वारा जनवरी 2023 महीने में विभिन्न गंभीर अपराधों में अपराधियों को धर दबोच कर कई मामलों की गुत्थी सुलझाते हुए पुलिस महकमे का सिर गर्व से ऊंचा किया था।

Scanned with CamScanner

CMYK

MHT

मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, शुक्रवार 17 फरवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

इस शिवरात्रि मुंबई के इन मंदिरों में करें दर्शन

...पेज-3

नोरा फतेही ने पूरी की 'मडगांव एक्सप्रेस' की शूटिंग

...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ कृष्ण पक्ष द्वादशी | 07.06 am / 06.39 pm | | अधिकतम 37°C / न्यूनतम 26°C | NSE Open 18,094.75 \| Close 18,035.85 / BSE Open 61,275.08 \| Close 61,319.50 | Rs. 56,730 Per 10 gm / Rs. 69,000 Per Kg |

# देशी पिस्टल व 7 जिंदा कारतूस के साथ 2 गिरफ्तार

**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत वालीव पुलिस ने क्षेत्र से दो अपराधियों को पकड़ा है, इनके पास से एक देशी पिस्टल, 7 जिंदा कारतूस व एक लोहे का सुरा बरामद किया है। मिली जानकारी के अनुसार, वालीव पुलिस ने 15 फरवरी को गुप्त सूचना के आधार पर गोलानी, वसई फाटा-रेंज नाका की ओर जाने वाली रोड से दो लोगों को पकड़ा, जिनके नाम धमेंद्र शिवबदन यादव (34) व हिरानाथ उर्फ मामा बनारसी यादव (48) है। जब्त किए सामान की कुल कीमत 99,500 रुपये का माल बरामद किया है।



## गुप्त सुचना के आधार पर कार्रवाई

उक्त आरोपियों के खिलाफ वालीव थाने में आईपीसी की धारा 3, 4, 25 व अन्य धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। पुलिस ने कहा कि उन्हें जानकारी मिली थी कि उक्त क्षेत्र में हथियार खरीदने और बेचने के लिए कुछ लोगों मोटरसाइकुल से आने वाले हैं। हालांकि, यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में वालीव थाने के पीआई कैलाश बर्वे व मिलिंद साबले (क्राइम पीआई) के नेतृत्व में एपीआई ज्ञानेश्वर फड़तरे की टीम ने की है।

Scanned with CamScanner